
# अधीक्षक अभियंता,

## सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन







# नागरिकांची सनद – २०२५

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम -४ ची माहिती.

# अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे कार्यालयाची

# नागरिकांची सनद — २०२५

## -----: अनुक्रमणिका :-----


| अ.क्र. | सनदीतील विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | २ |
| २. | कार्यालयाचे कार्यक्षेत्र | ३ |
| ३. | कार्यालयाची रचना | ४ ते ५ |
| ४. | कार्यालयाची बांधिलकी व जबाबदारी | ६ ते १० |
| ५. | रस्ते सुरक्षितता | ११ |
| ६. | सनदेची अंमलबजावणी | ११ ते १३ |
| अ. | जनसामान्यांकडून सूचना | |
| ब. | गाऱ्हाणी तक्रारी यांचे निराकरण | |
| क. | सनदेचा आढावा / सिंहावलोकन | |
| ७. | नागरिकांची जबाबदारी | १४ |
| ८. | परिशिष्टे | १५ ते १८ |
| ९. | अधिका-यांची सूची | १९ ते २० |
| १० | कार्यक्षेत्रदर्शक नकाशा | २१ |

# १. प्रस्तावना :-

मुंबई महाराष्ट्राची आर्थिक राजधानी असून या कार्यालयाचे कार्यक्षेत्र असलेल्या ठाणे व पालघर जिल्ह्याशी जोडून असल्यामुळे भौगोलीक दृष्ट्या त्यास अनन्य साधारण महत्व आहे. या कार्यालयाचे कार्यक्षेत्रालगत मुंबई सह नाशिक, अहमदनगर, पुणे हे जिल्हे तसेच गुजरात राज्य व दादरानगर हवेली केंद्रशासित प्रदेश आहेत.

मुंबई सार्वजनिक बांधकाम कोकण प्रादेशिक विभाग, मुंबई या कार्यालयाच्या अधिपत्त्यात हे कार्यालय कार्यरत असून या कार्यालयाचे अधिपत्त्याखाली येणाऱ्या ठाणे जिल्ह्याकरीता असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, ठाणे व सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, ठाणे आणि पालघर जिल्ह्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर व सार्वजनिक बांधकाम विभाग , जव्हार तसेच आदिवासी सा.बां. विभाग, ठाणे या कार्यालयांचे माध्यमातून नागरीकांशी बांधिलकी जपण्यास हे कार्यालया कटीबद्ध आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याने निर्धारीत केलेल्या व पथदर्शित केलेल्या सार्वजनिक सेवा सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरीकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत व त्यांचे बांधकाम खात्याविषयीचे हक्क प्रगतीच्या व विकासाच्या दृष्टीने अतिशय सुलभतेने पोहोचविण्याचा हा ध्यास आहे.

सही /-

अधीक्षक अभियंता,
ठाणे सा.बां.मंडळ, ठाणे .

## २. कार्यालयाचे कार्यक्षेत्र :-

सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे कार्यक्षेत्र खालील प्रमाणे विखुरलेले आहे.

सारूप :- १) लोकसभा मतदारसंघ – ०४

२) विधानसभा मतदारसंघ - २४

### अ) जिल्हा व तालुके

| जिल्हा ठाणे | | जिल्हा पालघर | |
|---|---|---|---|
| ठाणे | शहापूर | तलासरी | वाडा |
| कल्याण | मुरबाड | डहाणू | विक्रमगड |
| भिवंडी | उल्हासनगर | पालघर | मोखाडा |
| | अंबरनाथ | वसई | जव्हार |

### ब) मतदार संघ :-

| **लोकसभा** | **२२ पालघर (एस्.टी.)** | **२३ भिवंडी** | **२४ कल्याण** | **२५ ठाणे** |
|---|---|---|---|---|
| **विधानसभा** | १२८ डहाणू | १३४ भिवंडी(ग्रा.) | १४० अंबरनाथ | १४५ मिरा भाईंदर |
| | १२९ विक्रमगड | १३५ शहापूर | १४१ उल्हासनगर | १४६ कोपरी पाचपाखाडी |
| | १३० पालघर | १३६ भिवंडी (प.) | १४२ कल्याण पूर्व | १४७ ओवळा माजिवडा |
| | १३१ बोईसर | १३७ भिवंडी (पू.) | १४३ डोंबिवली | १४८ ठाणे |
| | १३२ नालासोपारा | १३८ कल्याण (प.) | १४४ कल्याण (ग्रा.) | १५० ऐरोली |
| | १३३ वसई | १३९ मुरबाड | १४९ मुंब्रा कळवा | १५१ बेलापूर |

# ३. कार्यालयाची रचना :-

**सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे.**

**राज्य क्षेत्र :- ठाणे जिल्हा**

| **सा.बां.विभाग, क्र.१, ठाणे** | **सा.बां.विभाग क्र.२, ठाणे** |
|---|---|
| सा.बां.उप विभाग क्र.१, ठाणे | सा.बां.उप विभाग, उल्हासनगर |
| सा.बां.उप विभाग, क्र.२, ठाणे | सा.बां.उप विभाग, उल्हासनगर |
| सा.बां.उप विभाग, क्र.३, ठाणे | सा.बां.उप विभाग क्र.१, मुरबाड |
| सा.बां.उप विभाग, क्र.४, ठाणे | सा.बां.उप विभाग क्र.२, मुरबाड |
| सा.बां.उप विभाग, क्र.५, ठाणे | सा.बां.उप विभाग क्र.३, मुरबाड |
| सा.बां.उप विभाग, भिवंडी | सा.बां.उप विभाग क्र.१, शहापूर |
| सा.बां.उप विभाग,कल्याण | सा.बां.उप विभाग क्र.२, शहापूर |
| द. व गु.नि. सा.बां. उप विभाग, ठाणे | मा. प्र. उप विभाग क्र.३, ठाणे |
| यांत्रिकी सा.बां. उपविभाग, ठाणे | सा.बां.उप विभाग भिंगारी |

**राज्य क्षेत्र :- पालघर जिल्हा**

| **सा.बां.विभाग, पालघर** | **सा.बां.विभाग, जव्हार** |
|---|---|
| सा.बां.उप विभाग क्र.१, पालघर | सा.बां.उप विभाग, जव्हार |
| सा.बां.उप विभाग क्र.२, पालघर | सा.बां.उप विभाग, मोखाडा |
| सा.बां.उप विभाग, डहाणू | सा.बां.उप विभाग, वाडा |
| सा.बां.उप विभाग क्र.१, वसई | सा.बां.उप विभाग, विक्रमगड |
| सा.बां.उप विभाग, तलासरी | |
| मा. प्र. उप विभाग क्र.४, | |

**सार्वजनिक बांधकाम आदिवासी विभाग, ठाणे :-**

| | | |
|---|---|---|
| सा.बां.आदिवासी उपविभाग, शहापूर | सा.बां.आदिवासी उपविभाग, डहाणू | सा.बां.आदिवासी उपविभाग, जव्हार |

**स्थानिक क्षेत्र :-**

| | |
|---|---|
| ठाणे जिल्हा परिषद बांधकाम विभाग (पश्चिम) ठाणे. | पालघर जिल्हा परिषद बांधकाम विभाग (पूर्व) जव्हार. |

सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे राज्यक्षेत्र व स्थानिकक्षेत्र वरिलप्रमाणे विभागलेले असून, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे हे कार्यालय सदरील दोन्ही जिल्ह्यांचे नियंत्रक कार्यालय आहे.

सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाशी संबंधित असलेल्या लोकसभा, विधानसभा व विधानपरिषद सदस्य यांचे सार्वजनिक बांधकाम खात्याशी निगडीत असलेली मतदार संघातील कामे प्राधान्याने आवश्यकतेनुसार व निधीच्या अधिन राहून हाती घेऊन पुर्ण करण्यात येतात.

त्याच प्रमाणे सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयांतर्गत येणारी विशिष्ट कामे उदा. यांत्रिकी, विद्युत, संकल्पचित्र, वास्तूशास्त्र, उपवने व उद्याने यांचेशी संबंधीत

असल्यास त्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली सक्षम विभागीय कार्यालयाकडून करण्यात येतात.

सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात शहरी व ग्रामिण तालुके येत असल्याने जिल्ह्याचा विकास, प्रगती व नागरीकांचे प्रश्न यांचे अनुषंगाने अ.क्र.4 नुसार असलेल्या बाबींशी हे कार्यालय कटीबद्ध आहे.

**४. कार्यालयाची बांधिलकी व जबाबदारी :-**

१. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रांतर्गत परिरक्षण दुरुस्ती अंतर्गत देखभाली साठी असलेल्या शासकीय कार्यालयीन इमारती व निवासी इमारती तसेच रस्ते व पुलांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती शासनामार्फत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार प्रभावीपणे करणे पूर्ण करणे व सेवा, सुविधांचा स्तर उंचावणे.

२. रस्ते विकास योजना आराखड्यानुसार सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची नवीन बांधकामे, सुधारणा तसेच त्यावरील मोठे पूल, लहान पूल , रस्ते , इमारती, मोऱ्या यांची कामे विहित निकषास अनुसरुन गुणवत्तापूर्ण करणे.

३. आपल्या भारत देशाची धमणी समजले जाणारे व सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे

कार्यक्षेत्रात येणारे राज्य क्षेत्राकडील प्रमुख राज्य मार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग तसेच स्थानिक क्षेत्राकडील जिल्हा मार्ग, तालुका ग्रामिण मार्ग विहीत कालावधीत गुणवत्तापूर्ण दर्जाचे करणे.

४. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे अधिपत्त्यातील क्षेत्रीय कार्यालयांद्वारे योग्य माध्यमातून अन्य कॉर्पोरेट संस्थांना रस्त्यांच्या कडेने विविध सेवा वाहिन्या शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार टाकण्याचे प्रस्तावांच्या मंजूरीची कार्यवाही करणे

५. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे नाहरकतीचे दाखले, नकाशे क्षेत्रीय कार्यालयांचे माध्यमातून संबंधित यंत्रणेस विहित कालावधीत प्रदान करणे.

६. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी मनोरंजनाचे किंवा सार्वजनिक कार्यक्रम व शासकीय कार्यक्रमात जनतेच्या सुरक्षितते करीता तसेच अतिमहत्वाच्या (व्ही.व्ही.आय.पी./व्ही.आय.पी.) व्यक्तिंसाठी वापरावयाचे मंडप, स्टेज, हेलिपॅड इत्यादी बाबतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने

या मंडळाच्या अधिपत्त्यातील क्षेत्रीय कार्यालयाचे माध्यमातून तपासणी करुन प्रमाणित करण्यात येते.

७. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात येणाऱ्या नाट्य व सिनेमागृहांचे योग्यता प्रमाणपत्र जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिपत्त्यातील क्षेत्रीय कार्यालयाचे माध्यमातून तपासणी करुन प्रमाणित करणे.

८. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात उद्भवणाऱ्या आपत्कालीन घटनांचे अनुषंगाने जनहितार्थ तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकाशी संबंधित सुविधा उपलब्ध होण्याकरीता स्थापत्य अभियांत्रिकी कामे करणे व मदत करणे.

९. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयात व विभागाच्या अधिपत्त्यातील सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

१०. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे अधिपत्त्यातील सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या जाहिररित्या फलकावर प्रदर्शित करणे.

११. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे अधिपत्त्यातील सर्व कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व

वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी/तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

१२. माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत विहित अर्जान्वये मागविण्यात आलेली माहिती शासकीय गोपनियतेचे उल्लंघन होणार नाही ही बाब पडताळून संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे बाबत सक्षम स्तरावर तत्पर कार्यवाही करणे.

१३. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे कामकाजात पारदर्शकता, सुसूत्रता आणून गितशील प्रशासकीय कामकाजाचा अवलंब करणे व आधुनिकता आणून सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१४. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व विषयांची अनुसूची तयार करणे व निपटारा करणेच्या विहिती कालावधी बाबत अंमलबजावणी करणे.

१५. शासनाच्या नवीन तक्रार पोर्टलवरील तक्रारदाराला तात्काळ दखल घेतली जाते.

१६. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे अधिपत्त्यातील सर्व कार्यालयात सर्व अभिलेख अद्यावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत ठेवणे. नागरीकांच्या प्रश्नांची व खात्याशी

संबंधित असलेल्या विषयाची माहिती व केलेली कार्यवाही नागरीकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे.

१७. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात येणाऱ्या ग्रामपंचायत स्तरापासून ते विधान सभेच्या / विधान परिषदेच्या तसेच लोकसभेच्या प्रतिनिधींपर्यत त्यांना आवश्यक असलेली माहिती त्वरीत पूरविणे व जनसंपर्क राखणे.

१८. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे अधिपत्त्यातील सर्व कार्यालयांतर्गत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेत स्थळावर (www.mahapwd.gov.in) अद्यावत करुन उपलब्ध करणे करीता सर्व कार्यालयांना अवगत करणे व संगणकीय नेटवर्कने जोडणे.

१९. सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाचे अधिपत्त्यातील सर्व कार्यालयामध्ये दैनंदिन कामकाजात आधुनिकता, गतीमानता, व गुणवत्ता आणणे तसेच कार्यालयात सौजन्यपूर्ण सेवाभावी व उत्साही वातावरण ठेवणे व सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयासह सार्वजनिक बांधकाम खात्याची प्रतिमा उज्वल करणे.

२०. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिद्धी देणे.

## ५. रस्ते सुरक्षितता :-

रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्याचे दृष्टीने नियमित देखभाल दुरूस्ती करणे तसेच शासनाने नियुक्त केलेल्या अपघात निवारण समितीद्वारे प्रत्यक्ष पाहणी करुन निश्चित करण्यात आलेल्या अपघात प्रवण स्थळांची सुधारणा करणे करीता सुचविलेल्या उपाय योजने नुसार सदरील अपघात प्रवण स्थळांची सुधारणा व उपाय योजना टप्प्या टप्प्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात येते.

रस्ते सुरक्षिततेवर भर देऊन रस्त्यांवर तपशिलवार व आवश्यक असे माहिती व सूचना फलक लावण्यात येतात, जेणेकरुन रस्ते सर्वकाळ वाहतूकीस पादचाऱ्यांसह सर्वांना सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे.

## ६. सनदेची अंमल बजावणी :-

सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाच्या सदरील सनदेस व्यापक प्रसिध्दि देऊन नागरीकांच्या प्रतिक्रिया तसेच अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक सुधारणा करण्यात येतील.

सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे हे कार्यालय खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. या कार्यालयाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना सौजन्यपूर्ण

व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल याची दक्षता घेण्यात येते. ग्राहक केंद्रित सेवेची उद्दीष्टे प्राधान्याने अंगीकारून ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल तसेच कार्यपद्धती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरीकांचा सल्ला घेतला जाईल.

प्रशिक्षित व प्रोत्सहित कर्मचारी वर्गाद्वारे नवीन संगणकिय तंत्र वापरुन भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबद्ध निराकरण करण्यात येईल व तक्रारशून्य सेवा असल्याची खात्री केली जाईल.

**अ. जनसामान्यांकडून सूचना :-**

सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननिय नागरिकांच्या बहूमुल्य सुचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वत:हून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीता नाही. ती ग्राहकांना म्हणजे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**ब. गाऱ्हाणी तक्रारी यांचे निराकरण :-**

नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण विहित कालावधीत करणे हे प्रमुख उद्दीष्ट राहिल. कार्यपूर्तीस होणारा विलंब व अन्य काही गाऱ्हाणी कार्यालयाच्या अखत्यारीतील क्षेत्रीय कार्यालयांबाबत अथवा मंडळांतर्गत काही कामांबाबत असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालया विरुद्ध गाऱ्हाणे / तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी. अशा गाऱ्हाणी व तक्रारींचे निराकरण संबंधित कार्यालयाकडून सात दिवसांत करण्यात येईल.

गाऱ्हाणी समक्ष भेटीत, पत्राने वा ई-मेलद्वारेही नागरिक मांडू शकतात.

**क. सनदेचा आढावा / सिंहावलोकन :-**

सदरील नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकते बाबतचा आढावा कार्यालयांतर्गत सक्षम अधिकारांतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात येईल.

## ७. नागरिकांची जबाबदारी :-

अ. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

आ. नागरिकांना आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्ण मिळावी.

इ. नागरिकांचा प्रतिसाद विकास कामांसाठी पोषक असावा.

ई. माहिती प्रदान करण्यासाठी विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

उ. सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था जोपासण्यास सहाकार्य करावे.

ऊ. नागरिकांनी सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नये व सार्वजनिक हिताचे दृष्टीने शासनास तगादा लावावा लागू नये म्हणून अतिक्रमण धारकाने स्वखर्चाने व स्वेच्छेने अतिक्रमणे दुर करावीत. अशी बाब टाळण्यासाठी नागरिकांनी शासनाने विहित केलेल्या पथकिनारवर्ती नियमांचे अधिनतेने रितसर परवानगी घ्यावी.

ऋ. रस्त्याच्या कडेने व शासकीय इमारती परिसरात करण्यात आलेल्या वृक्षराईंचे जतन करणे ही नागरीकांची सुद्धा नैतिक जबाबदारी राहील.

ऌ. नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियमांन्वये असलेल्या लिखित अलिखित संकेतांचे पालन करावे.

ऍ. नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

# ८. परिशिष्टे :-

## अ. कार्यपूर्तीचे वेळापत्रक :- परिशिष्ट-अ

| अ.क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | कंत्राटदार वर्ग-४ (रु. ९० लक्ष पेक्षा जास्त ते रु. १५०.०० लक्ष पर्यंत) व वर्ग-४(अ) (रु. ५०.०० लक्ष पेक्षा जास्त ते रु. ९०.०० लक्ष पर्यंत) नोंदणी व विहित मर्यादे नंतर नुतनीकरण | मुख्य अभियंता, क्षेत्रीय कार्यालय | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| २. | कंत्राटदार वर्ग-५ (रु. १५ लक्ष पेक्षा जास्त ते रु. ५०.०० लक्ष पर्यंत) व वर्ग-६ (रु. ०७.०० लक्ष पेक्षा जास्त ते रु. १५.०० लक्ष पर्यंत) आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंतांचे नोंदणीकरण (रु. १५०.०० लक्ष पर्यंत) व मजूर सहकारी संस्था वर्ग-अ (रु. ३०.०० लक्ष पर्यंत) यांचे वर्गीकरण व नुतनीकरण | अधीक्षक अभियंता | ३० दिवस |
| ३. | कंत्राटदार वर्ग-७ (रु. ०३ लक्ष पेक्षा जास्त ते रु. ०७.०० लक्ष पर्यंत) व वर्ग-८ (रु. ०२.०० लक्ष पेक्षा जास्त ते रु. ०३.०० लक्ष पर्यंत) व वर्ग-९ (रु. ०२.०० लक्ष पर्यंत) आणि आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग-ब (रु. ०७.५० लक्ष पर्यंत) यांचे वर्गीकरण इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची परिक्षा उत्तिर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग-७ मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण. | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ४. | निविदेचा वि धिग्राह्य कालावधी | अधीक्षक अभियंता | ७५ दिवस |
| | | कार्यकारी अभियंता | ६० दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | विश्रामगृहाचे आरक्षण | कार्यकारी अभियंता | ७ दिवस शिवाय Online आरक्षणही उपलब्ध |
| ६. | शासनाचे तक्रार पोर्टल | | ५ दिवस |
| ७. | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ८. | पेट्रोल पंप आणि पेट्रोल पंपाचे पोहोच मार्गाचे ना हरकत प्रमाणपत्र | महाराष्ट्र शासन | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ९. | रस्ता ओलांडून जाणाऱ्या वाहिन्यांसाठी ना हरकत प्रमाणपत्र | मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| १०. | चलचित्र गृहाचे योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ११. | सरकारी इमारतींचे नाउपलब्धता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १२. | सरकारी निवासस्थान न मिळण्याचे प्रमाणपत्र (अनुपलब्धता प्रमाणपत्र) | कार्यकारी अभियंता | ०७ दिवस |
| १३. | सरकारी निवासस्थान मिळण्या बाबतचे प्रतिक्षा यादी क्रमांक | कार्यकारी अभियंता | ०७ दिवस |
| १४. | सरकारी निवासस्थानी राहणाऱ्या निवृत्त कर्मचाऱ्याच्या बाबतचे नाहरकत दाखले | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| १५. | रास्त भाडे / प्रमाण भाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १६. | इमारतीच्या भाड्याचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १७. | इमारतींचे मुल्य निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |

## ब. इमारती, रस्ते व पूल या बाबतची माहिती :- परिशिष्ट- ब

### १. रस्ते :-

| अ.क्र. | रस्त्याचा प्रकार | एकुण लांबी |
|---|---|---|
| **जिल्हा ठाणे** | | |
| १ | प्रमुख राज्य मार्ग | २६.४३ |
| २ | राज्य मार्ग | २४८.८३ |
| ३ | प्रमुख जिल्हा मार्ग | ८४४.१४ |
| **जिल्हा पालघर** | | |
| १ | प्रमुख राज्य मार्ग | ९२.१५ |
| २ | राज्य मार्ग | ५८६.७५ |
| ३ | प्रमुख जिल्हा मार्ग | १०३५.९४ |
| **एकुण ठाणे सा.बां. मंडळ** | | |
| १ | प्रमुख राज्य मार्ग | **१२४.५९** |
| २ | राज्य मार्ग | **८३५.५८** |
| ३ | प्रमुख जिल्हा मार्ग | **१८८०.०८** |
| **एकुण** | | **२८४०.२६** |

### २) पूल :--

| जिल्हा | २०० मीटर वरील | ६० मीटर वरील | ३० मीटर वरील | ३० मीटर खालील | एकूण पूल |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | संख्या | संख्या | संख्या | |
| **ठाणे** | ६ | २१ | ३४ | ९३ | **१४०** |
| **पालघर** | ६ | १६ | ४६ | २६६ | **३३४** |
| **एकूण** | **१२** | **३७** | **८०** | **३५९** | **४७४** |

## ३) इमारती :-

| अ.क्र. | उपभोक्ता विभागाचे नाव | ठाणे जिल्हा | | पालघर जिल्हा | | एकूण जोते क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०५९-अनिवासी | २२१६- निवासी | २०५९-अनिवासी | २२१६- निवासी | २०५९-अनिवासी | २२१६- निवासी |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | इतर प्रशासकिय इमारती | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २ | गृह | ७८९२५.५० | १५६०५३.३५ | ५६४३.३४ | २८०४३.६३ | ८४५६८.८४ | १८४०९६.९८ |
| ३ | महसुल व वने | ३९१०५.५५ | ७१५८.५१ | २४११४.६७५ | ७०५९.४३ | ६३२२०.२२५ | १४२१७.९४ |
| ४ | कृषी | ३९४१.१५ | ०.०० | १५४.५२ | १८०.४९ | ४०९५.६७ | १८०.४९ |
| ५ | शालेय शिक्षण | ११६०.८८ | ७८१.६९ | १३४२९.८६ | ३१२६.५८ | १४५९०.७४ | ३९०८.२७ |
| ६ | वित्त | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | सार्वजनिक बांधकाम | १५०५३.५२ | २०६७६.८६ | १३०७६.६७ | ५६०५.३३ | २८१३०.१९ | २६२८२.१९ |
| ८ | विधी व न्याय | ७६०२७.०४ | १३५२६.७२ | ८७८९.२४ | ५०३६.५९२ | ८४८१६.२८ | १८५६३.३१२ |
| ९ | आरोग्य विभाग | ८७३६३.८५ | १९१०८.३५ | १८७३३.४८ | ९३४३.१६ | १०६०९७.३३ | २८४५१.५१ |
| १० | उच्च तंत्र शिक्षण | ७२६८९.८३ | १२६२.२९ | ८९७८.३८ | १८६.३० | ८१६६८.२१ | १४४८.५९ |
| ११ | महिला व बाल विकास | ५९९.७५ | ४३५८.१६ | ०.०० | ०.०० | ५९९.७५ | ४३५८.१६ |
| १२ | सामाजिक न्याय | ३५१७.४२ | ५९८३.७८ | ०.०० | ०.०० | ३५१७.४२ | ५९८३.७८ |
| १३ | आदिवासी विकास | ०.०० | ३७१६.७० | ०.०० | २०४७.६८ | ०.००० | ५७६४.३८ |
| १४ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | ८८४.०२ | ०.०० | ०.०० | ०.०० | ८८४.०२ | ०.०० |
| **एकूण** | | **३७९२६८.५१** | **२३२६२६.४१** | **९२९२०.१६५** | **६०६२९.१९२** | **४७२१८८.६८** | **२८०२६०.७६** |

# ९) अधिका-यांची सूची –

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | पद | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री.सिध्दार्थ अ.तांबे | अधीक्षक अभियंता | ठाणे सा.बां.मंडळ, ठाणे |
| २ | श्री. संदेश दि.जैन | सहा. अधीक्षक अभियंता | ठाणे सा.बां.मंडळ, ठाणे |
| ३ | श्री.एस.एम.पाटील | कार्यकारी अभियंता | सा.बां.विभाग,ठाणे क्र.१ |
| ४ | श्री. एस.एम.कांबळे | कार्यकारी अभियंता | सा.बां.विभाग,ठाणे क्र.२ |
| ५ | श्री.नितीन वा.भोये | कार्यकारी अभियंता | सा.बां.विभाग, जव्हार |
| ६ | श्री. सचिन पी. पाटील | कार्यकारी अभियंता | सा.बां.विभाग,पालघर |
| ७ | श्री. चेतन क.वाणी | कार्यकारी अभियंता | सा.बां. आदिवासी विभाग,ठाणे |
| ८ | श्री.संदीप र. चव्हाण | कार्यकारी अभियंता | जिल्हा परिषद, बांध.विभाग,ठाणे |
| ९ | श्रीम. जागृती म. संखे | कार्यकारी अभियंता | जिल्हा परिषद, बांध.विभाग, पालघर |
| १० | श्री. जगदीश र. सोनार | उपकार्यकारी अभियंता | सा.बां.विभाग,ठाणे क्र.१ |
| ११ | श्रीम.भावना प. पंडीत | उपकार्यकारी अभियंता | सा.बां.विभाग,ठाणे क्र.२ |
| १२ | श्री.जी.सी.भोये | उपकार्यकारी अभियंता | सा.बां.विभाग, जव्हार |
| १३ | श्री.एम.के.जावळे | उपकार्यकारी अभियंता | सा.बां.विभाग,पालघर |
| १४ | श्रीम.एच.के.ठाकरे | उपकार्यकारी अभियंता | सा.बां. आदिवासी विभाग,ठाणे |
| १५ | श्री. सुनिल वि. बच्छाव | उपकार्यकारी अभियंता | जिल्हा परिषद, बांध.विभाग,ठाणे |
| १६ | श्री.ए.यु.पाटील | उपकार्यकारी अभियंता | जिल्हा परिषद, बांध.विभाग, पालघर |
| १७ | श्री.श्रीकांत उ. येवले | उप अभियंता | सा.बां.उपविभाग, क्र.१, ठाणे |
| १८ | श्री. संदेश दि.जैन अ.ति | उप अभियंता | सा.बां.उपविभाग, क्र.२, ठाणे |
| १९ | श्री. एस.ए.देशमुख | उप अभियंता | सा.बां.उपविभाग, क्र.३, ठाणे |
| २० | श्रीम.एस.एस. पवार | सहा.अभियंता,श्रे.१ | सा.बां.उपविभाग, क्र.४, ठाणे |
| २१ | श्रीम.एस.पी.काळबर | सहा.अभियंता,श्रे.१ | सा.बां.उपविभाग, क्र.५, ठाणे |
| २२ | श्री.दत्तु अ. गिते | उप अभियंता | सा.बां.उपविभाग, भिवंडी |
| २३ | श्रीम.संपदा मोहरीर | उप अभियंता | सा.बां.उपविभाग, कल्याण |
| २४ | श्री.दिक्षित अ.ति | उपविभागीय अभियंता | यांत्रिकी सा.बां.उपविभाग, ठाणे |
| २५ | श्रीम.भावना.प.पंडीत अ.ति | उपविभागीय अभियंता | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. ३ ठाणे |
| २६ | श्री.पी.टी.मानकर | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग,उल्हासनगर |
| २७ | श्री.कैलास पा. पतिंगराव | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग,क्र.१ मुरबाड |
| २८ | श्री.रविंद्र ग. पवार | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग,क्र.२ मुरबाड |
| २९ | श्रीम.योगिता व.बहिरम | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग,क्र.३ मुरबाड |
| ३० | श्री.बळवंत रा. कांबळे | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग,क्र.१ शहापुर |

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | पद | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| ३१ | श्री.राहुल ज.चोळके | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग,क्र.२ शहापुर |
| ३२ | श्री.भि.ध.गावित | उप अभियंता | सा.बां. उपविभाग, भिंगारी |
| ३३ | श्री. एस.एम. पाटील अ.ति | उपविभागीय अधिकारी | सा.बां.उपविभाग,जव्हार |
| ३४ | श्री.विशाल अ. अहिरराव | उपविभागीय अधिकारी | सा.बां.उपविभाग,मोखाडा |
| ३५ | श्री. एस.पी. डोंगरे | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग,वाडा |
| ३६ | श्री. एस.एम. पाटील | उपविभागीय अधिकारी | सा.बां.उपविभाग,विक्रमगड |
| ३७ | श्री.हेमंत डी. भोईर | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग,क्र.१ पालघर |
| ३८ | श्री.पोपट रा. चव्हाण | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग,क्र.२ पालघर |
| ३९ | श्री.अजय डी.जाधव | उपविभागीय अधिकारी | सा.बां.उपविभाग, डहाणु |
| ४० | श्री.एस.आर.याधव | सहा.अभियंता,श्रे.१ | सा.बां.उपविभाग, क्र.१ वसई |
| ४१ | श्री.पी.एन.ठाकरे | उपविभागीय अभियंता | सा.बां.उपविभाग, तलासरी |
| ४२ | श्रीम.रिया प्र. वाकचौरे | सहा.अभियंता,श्रे.१ | सा.बां. आदि. उपविभाग, शहापुर |
| ४३ | श्री.भरत मा.तांबे | उप अभियंता | सा.बां. आदि. उपविभाग, डहाणु |
| ४४ | श्री.अतुल ए. छापरवाल | उप अभियंता | सा.बां. आदि. उपविभाग, जव्हार |
| ४५ | श्री.व्ही.एन.खैरनार | उपविभागीय अभियंता | जि. प. उपविभाग, शहापुर |
| ४६ | श्री.एस.एन.कोरडे | उपविभागीय अभियंता | जि. प. उपविभाग, मुरबाड |
| ४७ | श्री.एस.डी.महाडीक | उपविभागीय अभियंता | जि. प. उपविभाग, कल्याण |
| ४८ | श्री.राजेंद्र स.नाळे | उपविभागीय अभियंता | जि. प. उपविभाग, भिवंडी |
| ४९ | श्री.विजयकुमार गो. पोतदार | उपविभागीय अभियंता | जि. प. उपविभाग, अंबरनाथ |
| ५० | अतिरिक्त | अतिरिक्त | जिल्हा ग्रा. विकास यंत्रणा, ठाणे |
| ५१ | श्री.व्ही.डी.काळे अति | शाखा अभियंता अतिरिक्त | जि. प. उपविभाग, मोखाडा |
| ५२ | श्री.एस.एम.शिंदे | उपविभागीय अभियंता | जि. प. उपविभाग, पालघर |
| ५३ | श्री.एम.बी.अंभारे | शाखा अभियंता | जि. प. उपविभाग, जव्हार |
| ५४ | श्री.एम.के.डाबेराव | शाखा अभियंता | जि. प. उपविभाग, डहाणु |
| ५५ | श्री. मनोज अंबोरे अति | शाखा अभियंता अतिरिक्त | जि. प. उपविभाग, तलासरी |
| ५६ | श्री. एच.एम.कांबळे अति | शाखा अभियंता अतिरिक्त | जि. प. उपविभाग, वाडा |
| ५७ | श्री. एच.एम.कांबळे | उप अभियंता | जि. प. उपविभाग, वसई |
| ५८ | अतिरिक्त | अतिरिक्त | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पालघर |

# कक्षा दर्शविणारा नकाशा

# जिल्हा ठाणे व पालघर

